(6)

पुणे जिल्हा परिषद,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/स्वयंशाळा / 9928 /२०१६
पुणे ०१ दिनांक 8/92/२०१६

प्रति,

अध्यक्ष /सचिव / मुख्याध्यापक,
**महारिया चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई संचलित सहयाद्री व्हॅली पब्लिक स्कुल,राजुरी,ता,जुन्नर जि.पुणे.**

**विषय - <u>सन-२०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्ति शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्ति तत्त्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विदद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यसाठी परवानगी देण्याबाबत.</u>**

**संदर्भ-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्ति शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण क्र.२४ ) दि.०२ जुलै २०१४.
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,यांचा शासन निर्णय क्र.एसएसएस
३) मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे यांचेकडील आदेश क्र.शिउसं/प्राथ-२ स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१४ ११२२२३ /दि.१७ मे २०१४
४) मा.शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील आदेशक्र.अमाशा/स्वयंअर्थ/२०१३/१५-क(५) १०८४२ दि.२० नोंव्हेबर २०१३

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्य संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियम) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापन** करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ- क्र.२ च्या शासन निर्णयानुसार **नविन शाळा स्थापन** करणेकरिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव पुर्ण पत्ता | मान्यतामिळालेल्या शाळेचे नाव वपुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नविन /दर्जावाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/ उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महारिया चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई | सहयाद्री व्हॅली पब्लिक स्कुल,राजुरी ता,जुन्नर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक व उच्च प्राथमिक (इ. १ली ते ८ वी ) | स्वयंअर्थसहाय्यित सन २०१४-१५ |

## अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम,शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणत्याही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे.त्या ठिकाण व्यतिरिक्त अन्वय ठिकाणी शाळा सरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

४. संदर्भ- क्र.४ अन्वये सन २०१८-१९ मध्ये सुरू असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.

५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रददबातल ठरेल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमि होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियम) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवनी शाळा / वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहिल.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियम) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाण स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियम) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहिल.

शासनची सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमाची अंमजबजावणी करणे बंधनकारक राहिल.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१. मा.सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग ,मंत्रालय,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१
४. मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे-१
५. गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती जुन्नर

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/स्वयंअंशाळा/EOSpe-01/१८
दिनांक :- १५/१२/२०१८

**प्रति,**

अध्यक्ष/ सचिव
महारिया चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई

**विषय :- इ. ९ वी ते १२ वी पर्यतचे वर्ग सुरू करण्यास परवानगी मिळणेबाबत...**

**संदर्भ क्र:** १. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. १७/६/२०१६
२. मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र
जा.क्र. शिउसं/प्राथ२/स्वयंअशाळा/११२४/२०१६ दि. ८/१२/२०१६
३. आपणाकडील पत्र जा.क्र. Mct/Admin/२०१८-१९/६६३A दि. २१/९/२०१८
प्राप्त दि. २९/११/२०१८

उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये महारिया चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई संचलीत सहयाद्री व्हॅली पब्लिक स्कूल राजूरी ता. जून्नर जिल्हा पुणे या शाळेत इ. ९ वी ते १२ वीचे वर्ग सुरू करण्यास परवानगी मागीतली आहे. सदर शाळेस खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीनरहून इ. ९ वी ते१२ वी चे वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१. विदयार्थी संख्येच्या प्रमाणत पुरेशा वर्ग खोल्या उपलब्ध असाव्यात.

२. मुले व मुली यांच्या साठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध असावीत.

३. पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असावी.

४. विदयार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे मैदान उपलब्ध असावे.

५. मुख्याध्यापक खोली,शिक्षक खोल्या, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोग शाळा इत्यादी भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात.

६. शाळा प्रवेशाबाबत कोणतीही तक्रार उत्पन्न होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७.वर्ग सुरू करताच या कार्यालयाची प्रथम मान्यता तत्काळ घेण्यात यावी.

८. उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ मधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधन कारक राहील.

**(गणपत मोरे)**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत : माहिती व कार्यवाहीस्तव**
प्राचार्य,
सहयाद्री व्हॅली पब्लिक स्कूल राजूरी ता. जून्नर जिल्हा पुणे